# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**4 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

जमीनजुमला, जुने वाडे, घरे इत्यादी स्थावर मिळकत खरेदी
करत असताना जमीन घेणाऱ्याला काय हक्क प्राप्त झाले याचे वर्णन
करताना जल, तरु, काष्ठ, पाषाण, हवा, उजेड असे त्या जमिनीशी
निगडित सर्व हक्क लिहून घेतले जातात.

वर वर पाहता असे लांबलचक वर्णन म्हणजे, असेल कायद्याची काही
तांत्रिकता, असे म्हणून ते समजून घेण्याची तसदीही फार कोणी घेत नाहीत.
मात्र अशी जमीन घेतली म्हणजे तिचे दृश्य स्वरुपातील आकारमान किंवा
वाडे, घरे घेतली तर त्यांचे बाह्य स्वरूप व अंतर्गत खोल्यांची रचना
एवढाच हक्क त्या खरेदीखताला अभिप्रेत असतो. ती जमीन मालकी
हक्काने वहिवाटत असताना त्या जमिनीतील दगड, माती, झाडे, तसेच
तेथील विहिरीचे व भूगर्भातील पाणी, त्याचप्रमाणे राहते घर असेल तर
वहिवाटीच्या सर्व हक्कांसह त्या घराच्या बांधणी मध्ये वापरलेल्या सर्व
साहित्याची व त्या घरातील सर्व वस्तूंची मालकी त्या खरेदीखतामध्ये
ती मिळकत घेणाऱ्याच्या नावाने केलेली असते. अशा जमिनीमध्ये अथवा
घरामध्ये पूर्वीच्या काळचे गुप्तधन व मौल्यवान वस्तू सापडल्यास
त्यांचे जाहीर प्रकटन करुन त्याची मालकी ठर विण्याच्या अधिकार बाबत भारतीय गुप्तधनसंपदा
अधिनियम, १८७८ मध्ये तरतूद केलेली आहे.

---